# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## नव उद्योजक विकास (Start Up) उपक्रमाचे श्री. दिपक घैसास यांच्या हस्ते उद्‌घाटन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे, ही संस्था विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नेहमीच कटीबध्द आहे. विद्यापीठीय शिक्षणाबरोबरच इतर गुणवत्तावर्धक व कौशल्य विकासाच्या दृष्टीने उपयोगी उपक्रम विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने राबविले जातात. परंपरागत व्यवसाय शिक्षण व पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण उद्योग-धंद्यांकरिता फारसे उपयुक्त ठरत नाही, अशी तक्रार उद्योगपती आणि शिक्षण तज्ञांकडून नेहमीच केली जाते.

तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनशैलीमध्ये नित्य नवीन बदल होत असतात. विद्यापीठीय शिक्षण आणि प्रत्यक्षात व्यवसाय किंवा नोकरीत उपयोगी पडणारे कौशल्य यामधील तफावत वाढत आहे. यामुळेच विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण देणे आणि त्यांच्या कौशल्य विकासाला (skill development) अग्रकम देणे आवश्यक झाले आहे. हिच गरज लक्षात घेउन, भारत सरकारने देखील कौशल्य विकास व नव-उद्योगांना चालना देण्यासाठी विशेष योजना सुरू केल्या आहेत.

विद्या प्रसारक मंडळाने हिच गरज लक्षात घेऊन पदवी प्राप्त व पदवीच्या अंतीम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख आणि कौशल्य विकास प्रणीत विशेष अभ्यासक्रम सुरू करण्याचे योजिले आहे. यामध्ये नोकरीबरोबरच उद्योजकता शिक्षण देऊन उद्योजक घडविण्यावर भर दिला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत नव-उद्योग (Start up) ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी ३ ते ६ महिन्यांचा पूरक अभ्यासक्रम विद्या प्रसारक मंडळ सुरू करीत आहे. उद्योजगतेच्या संदर्भात जाहीर झालेली सरकारची कायदेविषयक धोरणे, आर्थिक आणि सांस्कृतिक माहिती या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

**मंगळवार, दि. २६ जानेवारी २०१६** रोजी या उपक्रमाचे उद्‌घाटन प्रसिध्द उद्योगपती श्री. दिपक घैसास यांच्या हस्ते सकाळी ठिक १०.०० वाजता विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न होणार आहे. या प्रसंगी निर्लेप उद्योगसमुहाचे प्रमुख श्री. राम भोगले हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी आपणांस सादर निमंत्रण आहे.

सदर कार्यक्रमास उपस्थित राहून आपण या कार्यक्रमाची शोभा वाढवावी हि विनंती.

धन्यवाद!

**(डॉ. विजय वा. बेडेकर)**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे